**विशेष दिवाणी दावा क्रमांक – ४२/२०१८**
**नि.क्र. १६/क सोबत**

सरतपास शपथेवर सुरु

शपथपत्राच्या आधारे खालील दस्तऐवजांना निशाणी देणेत आली.

३. मी आजरोजी नि.क्र. ५७ सोबत प्रमाणपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास निशाणी क्र. ५८ देणेत येते. पूर्वी मी दिलेले प्रमाणपत्र नि.क्र.३४ लगत आहे. मी मे. जखोटीया ट्रेडींग कंपनी आणि जॅक बिर्लो उद्योग या दोन कंपनीचे काम पाहत असलेमुळे या कामी जॅक बिर्लो उद्योगचे नांवे दिलेले प्रमाणपत्र नि.क्र. ३४ ला दाखल असल्याचे दिसते.

**उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. बी. खांडेकर यांचे तर्फे सुरु :-**

४. माझे बी.कॉम. पर्यंत शिक्षण झाले आहे. मला संगणकाचे तांत्रीक ज्ञान नाही. परंतु, मला संगणक हाताळता येतो. मला सॉफ्टवेअरचे ज्ञान नाही. आमचे संगणकीय प्रणालीमध्ये हॅट्रीक्स नावाचे सॉफ्टवेअर सद्या कार्यरत आहे. मी सन २०1३ पासुन वादी फर्ममध्ये काम करत आहे. मी डाटा एंन्ट्री आणि अकाऊंटींगचे काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, धनाजी प्रल्हाद सणगर यांचे देखरेखीखाली मी काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, मी कागदपत्रे पाहुन आणि सणगर यांचे सुचनेवरुन काम करतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांचेमधील प्रत्यक्ष व्यवहाराबाबत मला माहिती नाही. वादी व प्रतिवादी यांचेतील व्यवहार हे माझे समक्षच होत असतात. हे म्हणणे खरे नाही की, मला वादी व प्रतिवादी मधील व्यवहाराबाबत मला फक्त कागदोपत्री माहिती आहे. मी पूर्वीचे नि.क्र.३४ कडे दिलेले प्रमाणपत्र नजरचुकीने दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादीचे उलटतपासानंतर सदरची बाब माझे लक्षात आली. सदर प्रमाणपत्रामध्ये वादी फर्मचे नांव चुकीचे नमुद झाले होते. हे

मला सांगता येणार नाही की, नि.क्र.५८ लगत असलेले प्रमाणपत्र हे नवीन कायद्याप्रमाणे आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, जुन्या प्रमाणपत्रातील फक्त फर्मचे नांव बदलुन नि.क्र.५८ चे नवीन प्रमाणपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ ऑफीस वर्क करतो. मला ऑफीसबाहेर झालेले व्यवहाराबाबत कागदोपत्री माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वीचे प्रमाणपत्र चुकीने झालेमुळे मी नवीन प्रमाणपत्र पश्चात्त बुध्दीने दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादीला मदत करणेसाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा. श्रवणोत्तर स्वीकृत्त,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2026.02.16 11:16:06 +0530

दिनांक – १३.०२.२०२६.

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.